




दैनिक

महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■









●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ५ वे ●अंक २५५ ●रविवार,दि.१४ डिसेंबर २०२५ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 ●पान १ ●पाने ४ ●किंमत ३ रूपये

● dailymarathwadapatra2021@gmail.com ● https://marathwadapatra.com ● https://epaper.marathwadapatra.com ● Mo. 9822152955


# मनरेगाच्या नावात बदल; मजुरांचाही होणार फायदा केंद्राचा नवा कायदा

**नवी दिल्ली**

केंद्र सरकार लवकरच महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियमात (मनरेगा) बदल करण्याच्या तयारीत आहे. सरकारी सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, केंद्रीय मंत्रिमंडळाने या योजनेअंतर्गत रोजगाराचे दिवस १०० वरून १२५ करण्याच्या आणि योजनेचे नाव बदलून 'पूज्य बापू ग्रामीण रोजगार हमी अधिनियम' करण्याच्या प्रस्तावावर चर्चा केली आहे.

मनरेगा कायद्यानुसार प्रत्येक कुटुंबाला १०० दिवसांच्या कामाची हमी दिलेली असली तरी, प्रत्यक्षात मिळणाऱ्या रोजगाराचे सरासरी दिवस खूपच कमी आहेत. सध्याची स्थिती पाहता २०२४-२५ मध्ये योजनेअंतर्गत प्रत्येक कुटुंबाला मिळणाऱ्या रोजगाराचे सरासरी दिवस केवळ ५० च्या आसपास होते. मागील आर्थिक वर्षात (२०२४-२५) केवळ ४०.७० लाख कुटुंबांनी १०० दिवसांची कामाची मर्यादा पूर्ण केली, तर चालू आर्थिक वर्षात हा आकडा फक्त ६.७४ लाख कुटुंबांपर्यंत पोहोचला आहे. या पार्श्वभूमीवर, रोजगाराचे दिवस वाढवण्याचा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे. हा प्रस्ताव १६ व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार १ एप्रिल, २०२६ पासून योजना सुरू ठेवण्याच्या प्रक्रियेनंतर आला आहे.मनरेगा २००५ मध्ये लागू झाली होती आणि तत्कालीन यूपीए सरकारने २ ऑक्टोबर २००९ पासून तिचे नामकरण 'महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम' असे केले होते. सूत्रांनुसार, आता एनडीए सरकारला नाव बदलण्यासाठी आणि कामाच्या हमीच्या दिवसांची संख्या १०० वरून १२५ करण्यासाठी कायद्यात बदल करावे लागतील. वास्तविक पाहता, आंध्र प्रदेश, मध्य प्रदेश, छत्तीसगड आणि राजस्थानसह अनेक राज्यांनी मनरेगा कामगारांसाठी १०० दिवसांच्या कामाची मर्यादा वाढवण्याची मागणी केली होती. राज्यांना १०० दिवसांपेक्षा ▶ उर्वरित पान २ वर

**वनहक्क अधिनियम, २०१६ अंतर्गत जमीन मिळालेले अनुसूचित जमातीचे कुटुंब १५० दिवसांच्या कामासाठी पात्र आहे. याशिवाय, दुष्काळ किंवा नैसर्गिक आपत्तीग्रस्त ग्रामीण भागात (गृह मंत्रालयाच्या अधिसूचनेनुसार) १०० दिवसांव्यतिरिक्त ५० दिवसांचे अकुशल काम दिले जाऊ शकते. मनरेगा योजनेच्या २००५ मधील सुरुवातीपासून आतापर्यंत एकूण ४८७२.१६ कोटी 'मनुष्य-दिवस' (४८.७२ अब्ज दिवसांपेक्षा जास्त काम) निर्माण झाले असून, या योजनेवर एकूण ११,७४,६९२.६९ कोटी रुपये खर्च झाले आहेत.**

### अंबाजोगाईच्या ऐतिहासिक 'छोटा हत्तीखाना'चा वनवास संपला; 7/12 वरुन खाजगी नाव हटले

# आ. नमिता मुंदडा यांच्या प्रयत्नामुळे 'जोगाई माहेरघर लेणी' अशी अधिकृत नोंद

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

शहराचे वैभव असलेल्या आणि ऐतिहासिक महत्त्व लाभलेल्या जोगाई सभामंडप (छोटा हत्तीखाना) येथील जागेच्या मालकी हक्काचा वाद अखेर संपुष्टात आला आहे. केज विधानसभा मतदारसंघाच्या आमदार नमिता मुंदडा यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे सातबारा उताऱ्यावर लागलेले खाजगी नाव हटवून आता 'जोगाई माहेरघर लेणी' अशी अधिकृत शासकीय नोंद करण्यात आली आहे. या महत्त्वाच्या बदलानंतर पुरातत्व विभागाने १२ डिसेंबर २०२५ रोजी संबंधित कंत्राटदाराला या वास्तूचे जतन आणि दुरुस्तीचे काम तात्काळ सुरू करण्याचे



आदेश दिले आहेत. या ऐतिहासिक वास्तूच्या जागेवर 'केरबा लक्ष्मण जिरे' असे खाजगी नाव लागल्याने मालकी हक्काचा वाद निर्माण झाला होता, ज्यामुळे राज्य संरक्षित स्मारकाचे सुशोभीकरण आणि दुरुस्तीचे काम बंद पडले होते. या गंभीर प्रकाराची दखल घेत आमदार नमिता मुंदडा यांनी प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला. त्यांच्या मार्गदर्शनामुळे आणि प्रशासकीय पातळीवरील हालचालींमुळे शासकीय यंत्रणेने या प्रकरणाची गंभीर दखल घेतली. अखेर महसूल विभागाने गाव नमुना सात (अधिकार अभिलेख पत्रक) मध्ये दुरुस्ती करून सदर जागा शासनाची म्हणजेच 'जोगाई माहेरघर लेणी' असल्याची नोंद केली आहे. छत्रपती संभाजीनगर ▶ उर्वरित पान २ वर

# धुळे-सोलापूर महामार्गावर प्रवाशांना लुटणारी टोळी गजाआड

**बीड । प्रतिनिधी**

धुळे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर प्रवाशांची वाहने अडवून, काचा फोडून शस्त्राचा धाक दाखवून दरोडा आणि जबरी चोरी करणाऱ्या सराईत टोळीला बीड स्थानिक गुन्हे शाखेने अटक केली आहे. या कारवाईमुळे महामार्गावरील एक दरोड्याचा आणि तीन जबरी चोरीचे असे एकूण चार गंभीर गुन्हे उघडकीस आले आहेत. पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांच्या आदेशानुसार, महामार्गावरील गुन्हे उघडकीस आणण्यासाठी स्थानिक गुन्हे

## दरोडा-जबरी चोरीचे ४ गुन्हे उघड!



शाखेचे विशेष पथक तयार करण्यात आले होते. पोलीस उपनिरीक्षक श्रीराम खटावकर यांच्या पथकाला ११.१२.२०२५ रोजी सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक विश्लेषण आणि गुप्त माहितीद्वारे आरोपी कळंब, जि. धाराशिव येथून केजच्या दिशेने येत असल्याची माहिती मिळाली. या माहितीनंतर पथकाने तातडीने नाकाबंदी लावली. आरोपींनी पोलिसांना पाहून गाडी न थांबवता पुढे पळून जाण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी पाठलाग करून गुन्हेगारांना ▶ उर्वरित पान २ वर

**अटक केलेले आरोपी (सर्व रा. मकरवाडी, ता. वाशी, जि. धाराशिव): ताब्यात घेतलेल्या आरोपींची नावे खालीलप्रमाणे आहेत: १. राहुल अनिल काळे (वय १९ वर्षे) २. विकास अनिल काळे (वय २१ वर्षे) ३. अनिल राम काळे (वय ४० वर्षे) या आरोपींनी त्यांचे साथीदार सुनील हिरमन दशांदे, सचिन ऊर्फ आवडया राम काळे आणि बबलू शिव दशांदे (सर्व रा. मकरवाडी) यांच्यासह मिळून वरील चारही गुन्हे केल्याची कबुली दिली आहे.**

# तुकाराम मुंढे यांना क्लीन चीन

## फडणवीसांना चेकमेट करण्याचा शाहांचा प्रयत्न?



**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यात दिवसभरात अनेक महत्वाच्या राजकीय घडामोडी घडल्या. आयएएस तुकाराम मुंढे यांना त्यांच्याविरोधात झालेल्या आरोपांमधून अधिकृतरीत्या क्लीन चीट देण्यात आली अमित शाह यांना देवेंद्र फडणवीसांना चेकमेट करायचे आहे, म्हणूनच ते एकनाथ शिंदेंना ताकद देत असल्याचा दावा ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केला नाशिक महापालिका निवडणुकीसाठी भाजपाने जोरदार तयारी केल्याने शिंदे-पवार गटातील नेते अस्वस्थ झाल्याची चर्चा रंगली मुंबईत भाजपाचा नव्हे तर महायुतीचाच महापौर होणार असल्याचा दावा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपुरात प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना केला ज्येष्ठ नेते शरद पवार यांना भारतरत्न देण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (शरद पवार) अहिल्यानगरचे खासदार नीलेश लंके यांनी केली या सर्व घडामोडी सविस्तर जाणून घेऊ

तुकाराम मुंढे यांना क्लीन चीन- आयएएस तुकाराम मुंढे यांना त्यांच्याविरोधात झालेल्या आरोपांमधून अधिकृतरीत्या क्लीन चीट देण्यात आली आहे. नागपूर महापालिकेचे तत्कालीन आयुक्त आणि स्मार्ट सिटी प्रकल्पाचे ▶ उर्वरित पान २ वर

### गंगाखेड-परळी मार्गावर ऑटोरिक्षा उलटला

# चालक बचावला, पण त्याच्या शेजारचा प्रवासी ठार

**परळी । प्रतिनिधी**

गंगाखेड येथे लग्नाच्या समारंभातून आनंदाने परळीला परतणाऱ्या राऊत कुटुंबावर काळाने घाला घातला. गंगाखेड-परळी मार्गावरील निळा पाटी परिसरात ऑटोरिक्षा उलटून झालेल्या अपघातात परळी शहरातील बबनराव राऊत (वय ६०) यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेमुळे परळी शहरात शोककळा पसरली आहे. आनंदाचा प्रवास ठरला शेवटचा- परळी शहरातील सुभाष चौक येथे बबनराव राऊत हे केश कर्तनालयाचे दुकान चालवत होते. सामाजिक आणि व्यावसायिक वर्तुळात ते परिचित होते. शुक्रवारी सकाळी ते आपल्या




नातेवाईकांसह गंगाखेड येथील एका लग्नसमारंभासाठी गेले होते. दुपारी लग्न आटोपून परत येण्यासाठी गंगाखेड बसस्थानकासमोर त्यांनी परळीकडे जाणाऱ्या ऑटोरिक्षात जागा पकडली. दुपारी सुमारे अडीच वाजण्याच्या सुमारास गंगाखेडजवळच निळा पाटीजवळ हा ऑटोरिक्षा अचानक उलटला. ऑटोरिक्षामध्ये चालकासह एकूण दहा प्रवासी ▶ उर्वरित पान २ वर

# सततच्या नापिकी; अन् डोक्यावर बँकेचं कर्ज, तरुण शेतकऱ्याचं दुसऱ्याच्या शेतात गळफास

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्याच्या माजलगाव तालुक्यातील मनुरवाडी येथील एका तरुण शेतकऱ्याने सततच्या नापिकीला कंटाळून औताच्या दोरीच्या साह्याने मनुरवाडी शिवारातील लिंबाच्या झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना सकाळी घडली गणेश विठ्ठल थोरात (वय ३४) असं आत्महत्या करणाऱ्या तरुण शेतकऱ्याचं नाव असून यासंदर्भात माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. या घटनेनं परिसरात एकच खळबळ उडाली असून गावावर शोककळा पसरली असल्याचं



बोललं जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार, तक्रारदार बिभीषण बबनराव थोरात वय (वय ४८, रा.मनुरवाडी) यांनी आज १३ डिसेंबर रोजी माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीत असं म्हटलं आहे की, 'माजलगाव तालुक्यातील मनुरवाडी येथील माझा चुलत भाऊ तरुण शेतकरी गणेश विठ्ठल थोरात याने आज १३ डिसेंबर रोजी सकाळी ८.०० वाजण्याच्या पुर्वी वेळ नक्की नाही, मनुरवाडी शिवारातील केशव घुमरे यांच्या शेतात बँकेचं कर्ज व सततच्या नापिकीला कंटाळून नैराश्यात जावून लिंबाच्या झाडाला औताच्या दोरीच्या साहाय्याने गळफास घेवून आत्महत्या केली'. दरम्यान, माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यू क्र. ४४/२०२५ दाखल करून पोलीस निरीक्षक बालक कोळी यांच्या आदेशाने पुढील तपास साहाय्यक फौजदार बळवंते हे करत असल्याचं सांगण्यात आलं आहे.

# बागायती वर्गवारीप्रमाणे नुकसानग्रस्त कापूस उत्पादक शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्या: आ. विजयसिंह पंडित

## मत्स्य व्यवसायाच्या विकासासाठीही आ. विजयसिंह पंडित यांनी विधानभवनात उठवला आवाज

**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई विधानसभा मतदार संघात झालेल्या अतिवृष्टीमुळे कापूस उत्पादक शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. कापूस पिक बागायती पिकाच्या वर्गवारीचे सर्व निकष पूर्ण करत असल्यामुळे कापूस शेतीचा बागायती शेतीमध्ये समावेश करून बागायती वर्गवारी प्रमाणे नुकसानग्रस्त कापूस उत्पादक शेतकऱ्यांना शासनाने आर्थिक मदत करावी अशी मागणी आ. विजयसिंह पंडित यांनी विधान भवनात अंतिम आठवड्याच्या प्रस्तावावर बोलताना केली तसेच अतिवृष्टीमुळे गेवराई विधानसभा मतदार संघासह बीड जिल्ह्यातील सिंचन तलाव, पाझर तलाव, बंधारे पूर्ण क्षमतेने भरलेले असून याचा लाभ मत्स्य व्यवसाय विकासासाठी होऊ शकतो. त्यामुळे शासनाने मत्स्यबीज रोपन करण्याची मोहिम जिल्हा स्तरावर राबवावी अशी मागणीही यावेळी आ. विजयसिंह पंडित यांनी केली.

नागपूर येथे सुरु असलेल्या हिवाशी अधिवेशनात आ. विजयसिंह पंडित यांनी अंतिम आठवड्याच्या प्रस्तावावर बोलताना आज कापूस उत्पादक शेतकरी आणि मत्स्य व्यवसाय या मुद्यावर सविस्तर चर्चा करून बागायतीच्या निकषाप्रमाणे कापूस उत्पादक शेतकऱ्यांनाही आर्थिक मदत करण्याची मागणी त्यांनी यावेळी केली. यावेळी बोलताना ते म्हणाले की, मराठवाड्यात सप्टेंबर-ऑक्टोबर महिन्यात मोठ्या प्रमाणावर अतिवृष्टी झाल्याने शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले, अशा परिस्थिती महायुतीचे सरकार शेतकऱ्यांच्या पाठिशी खंबीरपणे उभे राहिले. ऐन दिपावलीच्या तोंडावर ३१,६२८ कोटी रुपयांचे पॅकेज जाहिर करून शेतकऱ्यांना आधार देण्याचे काम केले. परंतु कधीही न भरून येणारे नुकसान मराठवाड्यात झालेले आहे, गेवराई विधानसभा मतदार संघात १ लाख ४० हजार हेक्टरवर कापसाचे पिक घेतले जाते, सगळ्यात जास्त फटका कापूस या पिकाला बसला आहे. कापूस पिक हे बागायती पिकाचे सर्व निकष पुर्ण करत असले ▶ उर्वरित पान २ वर

### ● मत्स्यबीज रोपन करण्याची मोहिम राबवावी- आ. विजयसिंह पंडित



**विधान भवनात अंतिम आठवड्याच्या प्रस्तावावर बोलताना आ. विजयसिंह पंडित यांनी मत्स्य व्यवसायाच्या विकासासाठी आवाज उठवला. यावेळी बोलताना ते म्हणाले की, यावर्षी मराठवाड्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे गेवराई विधानसभा मतदार संघासह मराठवाड्यातील प्रमुख जलाशय, उपसा सिंचन तलाव तसेच बंधारे पूर्ण क्षमतेने भरलेले आहेत. त्यामुळे या जलाशयात मत्स्यबीज तसेच झिंगाबीज संचयन करण्याची मोठी संधी उपलब्ध झाली आहे. यातूनच बीड जिल्ह्यात मत्स्य व्यवसायाच्या विकासाला चालना मिळेल. मराठवाडा प्रदेश जलसंपन्न असला तरी मत्स्य व्यवसायाच्या दृष्टीने योग्य नियोजन आणि संचयन न झाल्यामुळे स्थानिक मच्छिमार समाज तसेच ग्रामीण अर्थव्यवस्थेला अपेक्षित लाभ मिळत नाही. मत्स्यबीज आणि झिंगाबीज संचयन केल्यास ग्रामीण युवकांना, स्थानिक सहकारी संस्थांना उत्पन्न वाढीस प्रोत्साहन मिळेल तसेच मच्छिमार समाजाला रोजगारही मिळेल. त्यासाठी मराठवाड्यातील सर्व जलाशयात नियोजनबध्द पध्दतीने मत्स्यबीज व झिंगाबीज संचयन करण्याची कार्यवाही करावी. जिल्हानिहाय मत्स्य विभागाच्या देखरेखी खाली संचयनाची अंमलबजावणी करावी तसेच स्थानिक सहकारी संस्था व मत्स्य व्यवसायिकांना प्राधान्य द्यावे अशी मागणी त्यांनी यावेळी केली.**




*चिरंजीव नितीन प्रल्हाद येवले व चि. सौ. का. वैष्णवी मोतीराम हटवटे यांच्या शुभ विवाह प्रसंगी सह कुटुंब उपस्थित राहून शुभेच्छा देताना दैनिक मराठवाडा पत्र चे संपादक दत्तात्रय नरनाळे, सचिन येवले सह परिवार.*




# होय आम्ही लाडावलेले आहोत साहेब...

**शिक्षकांनी संप करणे म्हणजे, 'आम्ही राज्यातील बालकांना आणि येणाऱ्या पिढ्यांना शिक्षण देणार नाही, आम्ही त्यांच्या आयुष्याशी खेळू; आणि आम्हाला त्याची परवानगी द्या," असे म्हणण्यासारखे आहे. तुम्ही शिकवता, त्याचेच तर पैसे घेता ना?**

मा.आम.प्रशांत बंब साहेब

मा.साहेब आपण फार पोटतिडकीने शिक्षक,शिक्षण व विद्यार्थी यांचे प्रश्न मांडता साहेब...माझी विनंती आहे साहेब शिक्षकांच्या मनातली धगधगती आग व मळमळ पण आपण बोलावी साहेब ती पुढे मांडतोय साहेब.

"होय आम्ही पगार कशाचा घेतो हे सरकार व समाज आणि जनता चांगल्याप्रकारे जाणतात.आम्ही फक्त कोणाचा तळतळाट व वाईट करण्याचे पातक नाही घेत,गोर गरिबांच्या लेकरांच्या शाळा बंद करण्याच्या पाप नाही घेत.साहेब शिक्षण आम्ही अडवत नाहीये , की देणार नाही म्हणत नाहीच,फक्त तुम्ही माय बाप सरकार आम्हाला, शिकवण्यात खूप आनंद आहे साहेब यासाठी मी रोज मरमर मरतोय, मोर्चे काढतोय साहेब.पण काय करणार मे बाप सरकार, शिक्षकाला त्यापासून दुर कसे ठेवता येईल यासाठी पद्धतशीरपणे कार्य करत आहात. शिक्षक शाळेतील अध्ययन अध्यापनापेक्षा आपल्या सोपविलेल्या व थोपविलेल्या उपक्रमांचे अहवाल,फोटो,व्हिडिओ अपलोड करण्यातच व्यस्त असून सतत शाळेतून बाहेर पडावे लागते.साहेब या आधी ही आद. शाहू,फुले आंबेडकर, गायकवाड यांनी शिक्षणाची दार सर्वांसाठी उघडली ती तुम्ही सरकार माय बाप बंद करण्याचे रीतसर कार्यक्रम शोधत आहात. मा.बंब साहेब आपण बेंबीच्या देठापासून ओरडून समाजमनात सरकारी मराठी शाळांच्या व शिक्षकांच्या बद्दल समाजात विष पेरत आहात असे आपल्याला वाटतच नसेल...हो वाटणार कसे,धनदांडग्यांच्या शाळा,आपल्या उद्योगी व व्यावसायिक यांच्या शाळा कशा चालतील. जिप, नप, मनपा या शाळांच्या सुविधांच्या बाबतीतही बोला ना साहेब कधीतरी.आठ आठ तास आपली स्वतःला लघुशंका न करता कोंडून मुलांना शिकविणाऱ्या शिक्षिकांबद्दल ही बोला केंव्हातरी, मुख्यमंत्री माझी समृद्ध ग्राम पंचायत कार्यक्रमात सकाळी 8 ते रात्री 9 वाजेपर्यंत शिक्षकांना व शिक्षिकांना ताटकळत उभे ठेवणाऱ्या आपल्या लोकप्रतिनिधींच्या दबाव तंत्राबद्दल ही बोला कधीतरी...साहेब बोललात तर किती छान वाटेल आम्हाला...शाळेच्या गावी राहिल्यानंतर राजकीय पक्षपाती पणाला बळी पडणाऱ्या शिक्षकांच्या दुःखाबद्दल ही बोला साहेब...साहेब बोला हो...आमच्या रत्नागिरीत रात्री आरोग्य बिघडल्यावर दवाखान्यात नेताना झालेल्या आळीपाळी अत्याचाराबद्दल ही बोला साहेब. साहेब सिंधुदुर्गात एक शिक्षिका महिनाभर बेपत्ता असते नंतर तिच्या शरीरचा सापळा सापडतो साहेब याबद्दल ही बोला ना साहेब.दुःख नका मांडू पण आमच्या पगारावरून बोलताना हे सत्य पण सांगा हो साहेब.गडचिरोलीत शाळेत गेलेली शिक्षिका आई आता येईल नंतर येईल म्हणून वाट पाहणाऱ्या चिमुकल्या मुलांची केविलवाणी परिस्थिती यावर ही बोला साहेब.

आम्ही शिक्षक ७०% लाडावलेले आहोत, हेच आपले वाक्य आहे ना.आम्ही लाडावलो आणि आपण व आपले सरकार आमचं लाड करतंय हे खुप आनंददायक आहे.आपल्या दृष्टीने शिक्षकांना काहीच कामे नाहीत,पगार नुसता फुकट घेतात.मतदार याद्या पुनरीक्षण करणे, BLO शिक्षकच,गावसर्व्हे करून GDP साठी गाव विकास आराखडा तयार करणे,प्रत्यक्ष निवडणूक प्रक्रिया पार पाडणे,कुटुंबनियोजन जनजागृती करणे,मतदान जनजागृती स्वीप कार्यक्रम राबवणे,तुमच्या सारखे कायम जळतच असणारे लोकप्रतिनिधी यांच्या सभांना उपस्थित राहणे,एक वही वाटप करून त्या एका वहिसाठी ताटकळत उभे राहणे,तुमचे कार्यकर्ते त्यांच्या सोयीने कार्यक्रम आखणार आम्ही बिचारे महिला शिक्षिका पण आल्या तुमची वाट पाहत रात्री दहा दहा वाजेपर्यंत थांबणे,ही काही कामे आहेत का छे ! ही आपण लाड करत असलेल्या शुभेच्छा ची यादी आहे.

बर हे झालं आमच्या मूळ कर्तव्यापासून दूर जाऊन करण्याचा कामाचा लेखा फार क्षुल्लक आहेत. शालेय शिक्षण विभाग म्हणजे आमचं मुळ कर्तव्य जे परिपाठ, 100 टक्के नाव नोंदणी, 100 टक्के उपस्थिती, त्यात सरळ, युडायस, विद्यांजली, अटलअप, SQAAF, MMSS, NMSS, नवोदय, PM पोषण , परसबाग, SHVR, विनोबा, पंचायत राज,आदिवासी विकास समित्या दौरा, मा.न्यायालयीन समिती दौरे,दाखले देणे,नाही दिलं की आपले वरून फर्मान,बोनफाईड देणे,चार प्रकारच्या चाचण्या,SWIFT CHAT, BOAT, PAT, CHAT, DIKSHA, अध्ययन अध्यापन साहित्य निर्मिती( अध्यानाचा व अध्यापनाचा अजून मेळ नाहीच ),सेतू अभ्यास,उन्हाळी शिबिरे,मध्येच क्रीडा स्पर्धा, रोजची हजेरी ऑनलाईन, सारखे हा दिवस तो दिवस,वेगवेगळे सप्ताह,उठा फोटो काढत सुटा, अमुक लिंक भरा,तमुक लिंक भरा,धान्य तपासून व वजन करूनच घ्या,दर्जा तपासा (दर्जाचा धान्य येतो का कुठे ),मुलांचे गणवेश वाटा,बूट उचलून आणा वाटा व त्याचा हिशोब द्या( साहेब 1 वर्षा च्या लेकराची स्लीपर 200 रुपयाला आणि आपले अनुदान जसे काही स्वस्त धान्य दुकानात भेटतात ),आधार अपडेट करा,APAR आयडीकाढा, मुख्यमंत्री माझी शाळा,सुंदर शाळा, वनराई बंधारा बांधा,आरोग्य तपासण्या करून घ्या, विद्यार्थ्यांचे वजन उंची नोंद करा, राहिलाच वेळ तर शिकवा मुलांना...सांगा बंब साहेब अजून किती गरम करणार आमचा ..ब...

साहेब एवढं करून आपण अजून ताठ मानेने विचारणार गुणवत्ता कुठे आहे? ठेवलाय का तुम्ही शिक्षकाला शाळेत शिकवायला,का गोरगरिबांच्या लेकरांच्या हक्काचे शिक्षण दळीद्री करण्याचा डाव टाकताय साहेब, आज या सगळ्या कामांमुळे सरकारी शाळेतील पट डबघाईला आला आहे साहेब. जरा आशीर्वाद घ्या तळतळाट नको.( शिक्षक,विद्यार्थी व पालकांचा ).साहेब आपल्याला माहीतच असेल शाळेला किती अनुदान येतो.त्यातून शाळेचे स्वछतागृह दुरुस्त करू, स्वयंपाक गृह सुधारू,परसबागेला रोपे,खत पाणी आणू, मुलांच्या शैक्षणिक गुणवत्तेसाठी काही करू...सांगा साहेब आपले सरकार कोणत्या दर्जाचे धान्य शाळेत पुरवत आहे तपासला का साहेब कधी दर्जा धान्यदी मालाचा कधी बोलता का ठेकेदाराला नाही बोलणार इथे आपली जीभ जड होते...गणवेश कापड, शिलाई साहेब साधारण एका शर्ट ची 150 व पायजमा किंवा पॅन्ट 100 कपडा कशातून घ्यायचा साहेब ? आणि आपणच मायबाप पुन्हा दर्जा तपासायला साहेब...साहेब अजून राहील बघा वाईच सांगायचं... लेकांरांची नखं , स्वच्छता तपासणं , कंगवा , नेलकटर ठेवून नखं काढणं अल्पसंख्याक शिष्यवृत्ती साहेब ती काही मिळत नाही पण अर्ज मात्र दरवर्षी करतो साहेब, त्यातही वेबसाईट सुरळीत असेल तर पटकन नाहीतर आम्हीं दार लॉगिन ला 200 रुपये भरतो साहेब हा पैसा साहेब कोणाच्या खिशातून जातो साहेब. सुवर्णमहोत्सवी शिष्यवृत्ती साहेब,इतर मागास बहुजन कल्याण शिष्यवृत्ती साहेब,एकल पालक ,दिव्यांग,अनाथ कितीतरी निरर्थक फार्म माझा शिक्षक भरतो साहेब. साहेब एकदा खेड्यातल्या माझ्या गरिबांच्या लेकरांच्या बिन लाईट,बिन पंख्याच्या शाळेत बसून दाखवा ना साहेब,मुतायला आल्यावर धावत धावत आडोसा शोधून करून परत आल्यावरच फिलिंग सांगा साहेब, आमच्या काही शिक्षिका भगिनी शाळेच्या दोन भिंतीत एका बाजूला मुलींना उभं करून दुसऱ्या बाजूला छत्री ठेऊन लघुशंका करतात याच फील आपल्या घरात असणाऱ्या माताभगिनींना एकदा विचारून बघा ना साहेब.एखाद लेकरू आजारी पडला गरिबांचा तर माझे शिक्षक बांधव सामाजिक बांधिलकी जपत मदत निधी गोळा करून त्याच्या उपचारात हातभार लावतात साहेब. आमच्या महेंद्र जाधव सर व शुभांगी भांडारकर मॅडम रायगड जिल्ह्यातील खालापूर तालुक्यातील कैरे गावातील माहिती घ्या साहेब. दुष्काळाच्या, ( ओला,सुका )काळात मुक्त हाताने मदत करणारे शिक्षक, आपत्तीच्या काळात मदत करणारे करणारे शिक्षक, आमच्या चंद्रपूरच्या भगिनी अपघातात एक पाय व एक हात गमावून पण शाळेत बेडवर सलाईन घेत अध्ययन अध्यापन करतात त्यांना पण एकदा भेटून विचारा ना साहेब ही कोणती भूतदया व कसले विद्यार्थी प्रेम आहे.आपल्या सोबत असणाऱ्या चमचे बहाद्दूर शिक्षक मद्यपान करतात म्हणून सरसकट शिक्षकांना बदनाम करणे थांबवून बघा ना साहेब.

साहेब माझ्या शिक्षकांना शाळेच्या गावात राहायला काही अडचण नाही हो, पण आमची लेकरं मोठी होतात उच्च शिक्षण घेतात, आम्हालाही आई वडील नातेवाईक आहेत साहेब ते सुद्धा आजारी पडतात साहेब त्यांची शुश्रूषा पण करावी लागते ना साहेब...तरी सुद्धा आम्ही राहू ना साहेब फक्त एक RK प्रत्येक शिक्षकांना बांधून द्या ना साहेब आपल्या सरकारला तेवढी शिफारस करा ना साहेब.शौचालय नसेल तरी चालेल साहेब तेवढं आमच्या माता भगिनी अंघोळ करतील तेंव्हा गावातील टवाळखोर पोर त्याच्या अब्रूची लक्तरे वेशीवर टांगणार नाहीत याची खात्री द्याना साहेब.प्रत्येक शाळेत मुख्यालयी किंवा केंद्रात एक रुग्णवाहिका मिळेल का बघा नका साहेब... आद.प्रशांत बंब साहेब अजून सांगतो.अलीकडे काही जिल्ह्यांमध्ये बिबट्या सह अनेक हिंस्र प्राण्यांचा उपद्रव वाढला आहे त्यापासून आमची सुरक्षा हमी द्या ना साहेब.

साहेब जाता जाता शिक्षक म्हणून आम्ही हरवलो आहोत साहेब तेवढं शोधून देण्याची हमी द्या साहेब... शिक्षक बोगस मतदार शोधतात,सरकार गुणवत्ता शोधते,शाळा शिक्षकांची वाट पाहतेय,विद्यार्थी शिक्षकांच्या दर्शना साठी असूसलेत साहेब,पालक शिक्षण शोधत आहेत साहेब... वरील सगळ्या गोष्टीतून वेळ मिळाला शिकवायला की आपलेच NGO येतात साहेब गुणवत्ता तपासून स्तर निश्चिती करायला साहेब कुठून आणू गुणवत्ता साहेब...मला शिकवू द्या ना साहेब मला शिकवू द्या,मायबाप सरकार मला शिकवू द्या...साहेब शाळा बाह्य सर्व्हे मलाच करायचा आहे,स्थलांतर मीच रोखायचे आहेत,पालकांना रोजगाराच्या संधी मीच समजावून सांगायच्या आहेत,आता तुम्हीच सांगा साहेब काय करू मी...बाल विवाह थांबवायचे आहेत साहेब,दार आठवड्याला तक्रार पेटी उघडून अहवाल लिहायचा आहे साहेब, चार समित्यांची सभा घेऊन अहवाल लेखन करायचे आहे साहेब,विद्यांजली पोर्टलवर सगळ्या गोष्टी मलाच करायच्या आहेत साहेब,जंतांच्या, लोहाच्या,प्रथिनांच्या गोळ्या वाटप करून अहवाल द्यायच आहे साहेब,साहेब तुमच्या वाढदिवसाला व नैमित्तिक झाडे लावायची आहेत साहेब त्याचे खड्डे मीच खोदायचे आहेत साहेब फोटो काढून अहवाल द्यायचा आहे साहेब,प्रवेशोत्सवात पायाचे ठसे घेऊन मुलांना त्याची प्रत द्यायची आहे साहेब,त्याला दाखल करून त्याच्या आजी आजोबांना नवा भारत साक्षरता कार्यक्रमातून शिकवून परीक्षा घेऊन अहवाल द्यायचा आहे साहेब,शिक्षणाच्या वारीला पण जायचे आहे साहेब,इको क्लब, PLC, एक पेड माँ के नाम कार्यक्रम घ्यायचं व अहवाल देऊन पोर्टल ला माहिती भरायची आहे साहेब,साहेब अमृत कलश घेऊन मेरी माटी, मेरा देश म्हणत देशभक्ती पण दाखवायची आहे साहेब.माझं कोणी ऐको न ऐको पण मला मन की बात ऐकावच लागणार आहे साहेब...साहेब घर घर तिरंगा देता देता मला हर घर संविधान कार्यक्रम पण घ्यायचा आहे साहेब.माझा पूर्ण दिवस यातच जातो साहेब,माझ्या BP व शुगर चे टेन्शन घरचे घेऊन अर्धमेले झालेत साहेब.आपल्या सगळ्या वरच्या कार्यक्रमाच्या गडबडीत माझे दहावे व तेरावे कधी घालावे लागतील याची शाश्वती नाही राहिली साहेब.माझ्या सोबत शिकणारे शेत मजुरी करणारे माझे मित्र किमान 6 तासाची सुखाची झोप घेत आहेत साहेब,मला झोपेत सुद्धा लिंक व सांख्यिकी डेटा चा हिशोब चालू असतो साहेब,रात्री नेट चांगला चालतो म्हणून चोरासारखा काम करायला सुरुवात केली की नवरा/बायको एकमेकांना संशयाने पाहू लागले आहेत साहेब,यांचे ऑनलाईन काहीतरी लफडे सुरू दिसतेय अशी चर्चा ऐकून अर्धमेला झालो आहे साहेब.सांगा बंब साहेब मी माझ्याच घरी नाही तर गावात कधी राहू...TET चा अभ्यास कधी करू साहेब तुम्हीच सांगा साहेब...मुलांच्या, विद्यार्थ्यांच्या स्कॉलरशिप चा अभ्यास पण घ्यायचा आहे साहेब आणि मी परीक्षा द्यायला लागलोय साहेब.सांगा अशाने गुणवत्ता येईल का साहेब.

तुमच्या कानाजवळ येऊन हे सगळं वदवून घेणाच्या आमच्या कुऱ्हाडीचा दांडा, गोतास काळ यांच्या शाळा कधीतरी पहा साहेब... साहेब शिक्षक TET पास होणार नाहीत असे नाही, साहेब आम्ही शिक्षक च आहोत कलेक्टर,मुख्य कार्यकारी अधिकारी, व सर्व प्रशासनिक घडवणारे,साहेब तुम्ही आमदार आहात कधीतरी आपल्या शिक्षकाला आठवून बघा ना त्यांच्या काळी असणारी कामे आणि आताची शिक्षकांची कामे वेळ मिळाला तर नक्की बघा साहेब...साहेब एक मात्र विसरू नका बरं का, "शिक्षक कभी साधारण नहीं होता, प्रारब्ध और प्रलय उसकी गोदी मे खेलते है।" .साहेब आमच्या सेवा शर्ती व अटींचा व सेवा आचारसंहितेचा अभ्यास आपण केलाच असेल तरीपण एकदा आपल्या कानक्या ला सांगा,की शिक्षकांच्या सेवा 1952 पासून 1986 व 1992,195,2000,2005,2010,2011,2013,2015 व 2020 च्या प्रावधानांची तरतूद तपासून मग पहा म्हणून.नाहीच लागला त्यांना संदर्भ तर मला सांगा साहेब सगळ्या शासन निर्णयाची,अधिनियमाच्या व राजपत्राच्या प्रति मी उपलब्ध करून देतो साहेब.जाहीर सभा लावा आणि चर्चे ला बोलवा साहेब...फक्त एक विनंती राहील साहेब, आपली प्रकृती फार नाजूक असते असे कळले त्यामुळे आपण न चिडता,व्हायबल न होता शिक्षकांना पण ऐकून घ्यायला तयार व्हा साहेब,सोबतच्या शितावरून सगळ्या शिक्षकांची प्रतवारी नका ठरवू साहेब...आता थांबतो साहेब अजून काही आठवल्यास आपल्याला नक्की पाठवतो साहेब.

साहेब आपल्या बोलण्यामुळे अशी वेळ येऊ नये सरकार वर की सर्व शिक्षक सामूहिक राजीनामे एकाच दिवशी देतील... धन्यवाद!!

टिप-कोणत्याही प्रकारे कोणत्याही व्यक्ती,समाज,सरकार,घटक यांच्या भावना दुखविण्याचा कोणताही हेतू नसून एक शिक्षक म्हणून वाटणारी तळमळ बाहेर काढली आहे.)

**- आपला स्नेही**
**(सुभाष राठोड -9011858485)**
**एक अशैक्षणिक कामे व आपल्या असंबंध बोलण्याने त्रस्त शिक्षक.**

◆ पान ९ वरून पुढे...

## मनरेगाच्या नावात....

जास्त काम देता येते, परंतु त्यासाठी त्यांना स्वतःच्या निधीतून पैसे द्यावे लागतात, जे फार कमी राज्ये करतात. मागील आर्थिक वर्षात (२०२४-२५) तयार झालेल्या एकूण २९० कोटी 'मनुष्य-दिवसां'पैकी केवळ ४.३५ कोटी मनुष्य-दिवस राज्यांनी आपल्या अर्थसंकल्पातून निर्माण केले. महाराष्ट्र, छत्तीसगढ, ओडिशा, हिमाचल प्रदेश, केरळ, राजस्थान, मध्य प्रदेश आणि तेलंगणा या राज्यांनी स्वतःच्या संसाधनांमधून अतिरिक्त काम दिले आहे. मनरेगा कायद्यातील कलम ३ (१) नुसार, प्रत्येक ग्रामीण कुटुंबाला एका आर्थिक वर्षात 'शंभर दिवसांपेक्षा कमी नाही' इतके काम देण्याचा नियम आहे. परंतु हेच १०० दिवस बहुतेकदा 'वरची मर्यादा' ठरतात. सध्या सरकार निश्चित १०० दिवसांव्यतिरिक्त ५० दिवस अतिरिक्त काम देण्यास परवानगी देते.

## अंबाजोगाईच्या ऐतिहासिक....

येथील पुरातत्व विभागाचे सहाय्यक संचालक यांनी गुरुवारी (दि. १२) संबंधित कंत्राटदार संस्थेला पत्र पाठवून काम त्वरित सुरू करण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच, पोलीस आणि महसूल प्रशासनाला सहकार्य करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत. याबद्दल आ. मुंदडा यांनी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे आभार मानले आहेत. आमदार नमिता मुंदडा यांच्या प्रयत्नांमुळे अंबाजोगाईच्या सांस्कृतिक वैभवात भर घालणाऱ्या या वास्तूचा विकास आता निर्विघ्नपणे पार पडणार आहे.

## धुळे-सोलापूर...

त्यांच्या एमजी हेक्टर कारमधून ताब्यात घेतले. सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर आणि स्थानिक गुन्हे शाखा, बीडचे पो.नि. शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक श्रीराम खटावकर, पोलीस हवालदार सोमनाथ गायकवाड, मुन्ना वाघ, राहुल दशांदे, बाळूसानप आणि पोलीस अंमलदार अर्जुन यादव, आषपाक सय्यद, मनोज परजणे, अंकुश वरपे, आनंद मस्के, स्वाती मुंडे, विकी सुरवसे, तसेच वाहन चालक नितीन वडमारे यांनी मिळून केली आहे.

घडलेल्या प्रमुख घटना

१ - दि. ०४.१२.२०२५, वडगाव ढोक (ता. गेवराई): रस्त्यावर जॅकेट घालून गाडी अडवून बाहेरील राज्यातील प्रवाशांना लुटून मारहाण करून सोने व रोख रक्कम चोरली. (पो. स्टे. गेवराई, गु.र.नां ७१४/२०२५)

२ - दि. २५.०९.२०२५, संभाजी महाराज चौक (बीड): पहाटे ५ वाजता चालक झोपले असताना वाहनाजवळ येऊन गाडीची काच फोडली, आत बसलेल्या प्रवाशांना मारहाण करून सोने-चांदीचे दागिने हिसकावून चोरले. (पो. स्टे. बीड ग्रामीण, गु.र.नां ३१६/२०२५)

३ - दि. २०.११.२०२५, हॉटेल दुबई समोर: गाडी पार्क करून झोपलेल्या प्रवाशांच्या गाडीची काच रॉडने फोडून, शस्त्राचा धाक दाखवून मौल्यवान वस्तू चोरल्या. (पो. स्टे. बीड ग्रामीण, गु.र.नां ४०२/२०२५)

४ - दि. ०९.११.२०२५, धनवडे वस्ती (पाली): रात्री आयआरबी पार्किंग एरियाजवळ वाहन अडवून शस्त्राचा धाक दाखवून खिशातील रोख रक्कम बळजबरीने काढून घेतली. (पो. स्टे. बीड ग्रामीण, गु.र.नां ४१७/२०२५)

गुन्ह्यात वापरलेले साहित्य जप्त

आरोपींकडून काळ्या रंगाची विना नंबरची एमजी हेक्टर कार, तसेच वाहनाच्या डिक्कीमध्ये असलेले एक कोयता आणि लोखंडी रॉड जप्त करण्यात आले आहेत. अटक केलेल्या तिन्ही आरोपींना १२.१२.२०२५ रोजी गुन्ह्यात अटक करण्यात आली असून, पुढील तपास पोलीस ठाणे गेवराईचे सपोनि अण्णासाहेब पवार हे करत आहेत.

## तुकाराम मुंढे....

कार्यकारी मुख्य कार्यकारी अधिकारी असताना तुकाराम मुंढे यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप झाले होते. या दोन्ही प्रकरणांमधील चौकशीत ते निर्दोष असल्याचे सरकारमधील मंत्र्यांनी विधानसभेत सांगितले. तरीदेखील महिला अधिकाऱ्यांशी गैरव्यवहारप्रकरणी मुंढे यांची चौकशी अंतिम टप्प्यात असून, अहवाल महिनाभरात सादर होईल, असे उद्योगमंत्री उदय सामंत म्हणाले. पूर्व नागपूरचे आमदार कृष्णा खोपडे यांनी उपस्थित केलेल्या लक्षवेधीला उत्तर देताना सामंत यांनी मुंढेंना क्लीन चीट दिल्याचे माहिती दिली. खोपडे यांनी मुंढे यांच्यावर गंभीर आरोप केले होते. यानंतर तत्कालीन महापौर संदीप जोशी आणि आमदार प्रवीण दटके यांनी याप्रकरणी चौकशीची मागणी केली होती.

फडणवीसांना चेकमेट करण्याचा प्रयत्न ?

राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची धामधुम सुरू असताना शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी आज मुंबईतील पत्रकार परिषदेतून एक खळबळजनक दावा केला. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांना चेकमेट करायचे आहे, म्हणूनच ते उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना ताकद देत आहेत, असे संजय राऊत यांनी म्हटले आहे. फडणवीस आणि भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांचा महायुतीला विरोध असल्याचा दावाही राऊत यांनी केला. एकनाथ शिंदेंना ताकद दिली जात आहे, जेणेकरून फडणवीसांना दिल्लीत येण्यापासून रोखता येईल, असेही राऊत म्हणाले. एकनाथ शिंदे यांचा पक्ष हा अमित शाहाचा पक्ष आहे. महाराष्ट्रामध्ये देवेंद्र फडणवीस, रवींद्र चव्हाण हें महायुतीच्या विरोधात आहे. दोन ठाकरे एकत्र आले याची त्यांना भीती आहे. अशी टीकाही राऊत यांनी केली.

शिंदे-पवार गटाला भाजपाची धास्ती ?

आगामी महापालिकेच्या निवडणुका महायुती म्हणून लढवल्या जातील असे भाजपाने स्पष्ट केले असले तरी नाशिकमध्ये मात्र शिंदे-पवार गटात अस्वस्थता असल्याचे दिसून येत आहे. भारतीय जनता पक्षाने नाशिक महापालिकेच्या निवडणुकीसाठी जोरदार तयारी केल्याने महायुतीतील या दोन्ही मित्रपक्षांमधील नेते अस्वस्थ झाल्याची चर्चा रंगली आहे. भाजपा महायुती म्हणून आपणास जवळ करेल काय, अशी त्यांना धास्ती वाटत असून त्यास कारणही तसेच आहे. भाजपाच्या वतीने नाशिक महापालिकेसाठी उमेदवार निवड प्रक्रियेचा महत्त्वाचा टप्पा लवकरच सर्व प्रभागांतील इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती घेतल्या जाणार आहे. ही मुलाखत प्रक्रिया अत्यंत महत्त्वाची असल्याचे भाजपाचे म्हणणे आहे. महायुती म्हणून निवडणूक लढवायची असेल तर भाजपाने सर्वच प्रभागांसाठी इच्छुकांच्या मुलाखती घेण्याची काय गरज, अशी कुजबूज प्रश्न शिंदे गट आणि अजित पवार गटातील नेत्यांमध्ये सुरू आहे.

मुंबईत महायुतीचाच महापौर होणार : फडणवीस

मुंबईत भाजपाचा नव्हे तर महायुतीचाच महापौर होणार असल्याचा दावा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपूर येथे प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना केला. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये आपल्याला जास्तीत जास्त संधी मिळावी असे कार्यकर्त्यांना वाटते. परंतु आम्ही महायुती म्हणून एकत्रित निवडणूक लढवणार असल्याने कार्यकर्त्यांमध्ये फारशी नाराजी नाही. आमच्यासाठी मुंबई महापालिकेवर महायुतीचा झेंडा फडकविणे हे जास्त महत्त्वाचे आहे. मुंबईत भाजपाचा नव्हे तर महायुतीचाच महापौर होणार असल्याचा दावाही त्यांनी यावेळी केला. कल्याण-डोंबिवली महापालिका निवडणुकीत भाजपाने जास्त जागांची मागणी केलेली नाही. तिथेही केवळ शिवसेना आणि भाजपा हेच दोन प्रमुख पक्ष आहेत. गेल्या वेळच्या महापालिका निवडणुकीत भाजपाच्या ४२ जागा आल्या होत्या. त्यामुळे आम्ही आपापसात बसून जागावाटप करू, असेही फडणवीसांनी स्पष्ट केले.

## गंगाखेड-परळी...

होते. बचावलेला चालक फरार, त्याच्या शेजारचा प्रवासी दगावला- चालकाच्या शेजारी बसलेले बबनराव राऊत यांना रिक्षा उलटल्याने हँडलचा जोरदार मार लागला आणि त्यातच त्यांचा मृत्यू झाला. इतर प्रवाशांना किरकोळ दुखापत झाली आहे. हा अपघात होताच रिक्षा चालक तातडीने घटनास्थळावरून पसार झाला. बबनराव राऊत हे राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) चे परळीतील नगरसेवक पदाचे उमेदवार श्रीनिवास राऊत यांचे वडील होते. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा आणि दोन मुली असा मोठा परिवार आहे. उपजिल्हा रुग्णालय, परळी येथे त्यांच्यावर शवविच्छेदन करण्यात आले. नातेवाईकांच्या लग्नाच्या आनंदाच्या दिवशीच कुटुंबातील कर्त्या पुरुषाचा झालेला हा दुर्दैवी अंत परळी शहराला हळहळ लावणारा ठरला आहे.

## बागायती वर्गवारीप्रमाणे....

तरीपण कापसाला बागायतीच्या पिकात समाविष्ट करण्यात आले नाही. जिरायती क्षेत्रामध्ये समावेश करून कापूस उत्पादक शेतकऱ्याला अल्प मदत दिली जाते हे दुर्दैवी आहे. आपण मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार यांना पत्र देवून कापूस या पिकाचा बागायतीमध्ये समावेश करून घेण्याची मागणी केली होती. त्यावर चर्चाही झाली बागायतीप्रमाणे कापसालाही नुकसान भरपाई करण्याचा निर्णयही झाला पण आजपावेतो त्यासंदर्भातील आदेश निघालेला नाही. त्यामुळे याचाही विचार करून झालेल्या निर्णयाच्या आधारे शेतकऱ्यांना भरघोस आर्थिक मदत करण्याची मागणी आ. विजयसिंह पंडित यांनी केली.

◆ पान ४ वरून पुढे...

## अमर रहे...

आठवणींना उजाळा देण्यासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. आष्टी,कडा,धानोरा,धामणगांव, या शहरांसह चौकाचौकात लोकनेते गोपीनाथ मुंडे यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले जयंतीनिमित्त निमित्त गावागावातील नागरीक लोकनेते मुंडे यांच्या प्रतिमे समोर नतमस्तक झाले ठिकठिकाणी रक्तदान शिबिरे, आरोग्य तपासणी शिबिरे आणि शैक्षणिक साहित्य वाटप, किर्तन , महाप्रसाद यांसारख्या कार्यक्रमांचे आयोजन करून लोकनेत्याला अभिवादन करण्यात आले हजारो मुंडे प्रेमींनी सहभागी होत जयंती उत्साहात पार पडली अमर रहे..अमर रहे..मुंडे साहेब अमर रहे, मुंडे साहेबांचा विजय असो जोरदार घोषणाबाजी ने परिसर दणाणून गेला होता.

## 31 व्या अखंड...

आणि असंख्य भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. भक्ती, श्रद्धा आणि सेवाभाव यांचा संगम असणारे श्री क्षेत्र दत्तमंदिर हे केवळ पूजेचे स्थान नसून, भक्ती, श्रद्धा आणि एकतेचे प्रतीक आहे. दरवर्षी होणारे नामस्मरण व गीता पारायण सोहळे समाजात अध्यात्मिक जागृती घडवतात. मंदिर विकासासाठी राजेंद्र मस्के यांनी घेतलेला पुढाकार ही भाविकांच्या सेवेसाठी प्रेरणादायी पाऊल ठरणार आहे. या निर्णयाचे ग्रामस्थ व भाविकांनी उत्साहात स्वागत करून राजेंद्र मस्के यांना धन्यवाद दिले आहेत.

## तलवाडा पोलीसांनी...

स्थानबध्दतेचे आदेश जारी केल्याने तलवाडा पोलीसांनी त्यास ताब्यात घेवुन जिल्हा मध्यवर्ती कारागृह हर्मुल छत्रपती संभाजीनगर येथे स्थानबध्द केले. सदरची कामगिरी मा. पोलीस अधीक्षक श्री. नवनित कॉवत, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. सचिन पांडकर, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी, गेवराई श्री. अनिल कटके, पोलीस ठाणे तलवाडा प्रभारी अधिकारी सपोनि श्री. मनोज निलंगेकर यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस ठाणे तलवाडा येथील पोउपनि श्री. स्वप्निल कोळी, पोउपनि श्री. कैलास अन्नलदास, पोह/अंजन गडदे, पोह/विठ्ठल काकडे, पोना/सचिन गायकवाड, पोअं/विशाल वडमारे, पोअं/विकास थोरात, पोअं/पवन शेळके यांनी केली.

## लिंबागणेश गावात...

पत्रकार हरिओम क्षीरसागर यांनी केले तर आभारप्रदर्शन डॉ. गणेश ढवळे यांनी केले. यावेळी लिंबागणेशचे सरपंच बालासाहेब जाधव, पोखरी (घाट) चे सरपंच बिभीषण मुळीक, पिंपरनईचे सरपंच बाळासाहेब वायभट, उपसरपंच बाळकृष्ण थोरात, ग्रामपंचायत सदस्य श्रीहरी निर्मळ, दामोदर थोरात, सुरेश निर्मळ, मोहन कोटुळे, पांडुरंग वाणी, भगवान मोरे, रवी वायभट, कृष्णा वायभट, सुदाम मुळे, रमेश वाणी, संजय पावले, सुखदेव वाणी, विनायक वाणी, राजेंद्र कदम यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. बिबट्याचा वावर वाढल्यामुळे रात्रीच्या वेळी शेतात जाणे धोकादायक झाले आहे. महिला, लहान मुले व वृद्ध नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण असून अनेक पालकांनी मुलांना घराबाहेर जाण्यास मज्जाव केला आहे. या पार्श्वभूमीवर बिबट्याचा बंदोबस्त करण्यासाठी तात्काळ पिंजरे लावावेत, ड्रोनद्वारे शोधमोहीम राबवावी तसेच रात्रीच्या वेळी वनविभागाची गस्त वाढवावी, अशी ठोस मागणी डॉ. गणेश ढवळे यांनी वनसंरक्षक अशोक केदार व अधिकारी महेश मते यांच्याकडे केली. वनसंरक्षक अशोक केदार व महेश मते यांनी ग्रामस्थांना पुढील सूचना केल्या : बिबट्या दिसल्यास तात्काळ वनविभागाला कळवावे. घराभोवती झुडुपे व गवत वाढू देऊ नये. जनावरे सुरक्षित ठिकाणी बांधावीत. रात्री पुरेसा प्रकाश ठेवावा. लहान मुलांना एकटे बाहेर पाठवू नये. रात्री शेकोटी पेटवणे, मोठ्या आवाजात गाणी लावणे उपयुक्त ठरते

## डिजिटल ग्रंथालय...

असे सांगितले. यानंतर अंतर्गत मुल्यमापन हमी कक्षाचे प्रमुख प्रा. विनोद किर्दक यांनी कार्यशाळेत बोलत असताना पर्यावरण संरक्षणासाठी जनजागृती निर्माण करण्यात ग्रंथालये आणि शैक्षणिक संस्था यांची महत्त्वाची जबाबदारी असून, डिजिटल साधनांच्या माध्यमातून ही जबाबदारी अधिक प्रभावीपणे पार पाडता येते, असे त्यांनी सांगितले. प्रमुख पाहुणे म्हणून बोलत असताना प्रा.डॉ.बापूसाहेब जीवनराव भोसले म्हणाले कि, आजच्या डिजिटल युगात पेपरलेस लायब्ररी ही शाश्वत विकासाची संकल्पना असून शिक्षण, संशोधन आणि ज्ञानप्रसारासाठी अत्यंत उपयुक्त ठरत आहे. पर्यावरणीय समस्यांची सद्यस्थिती मांडत शाश्वत विकासासाठी माहिती तंत्रज्ञानाचे महत्त्व स्पष्ट केले. डिजिटल ग्रंथालयांमधील ई-पुस्तके, संशोधन लेख, डेटाबेस आणि ऑनलाइन शैक्षणिक साधने विद्यार्थ्यांना पर्यावरणविषयक अद्ययावत माहिती सहज उपलब्ध करून देतात, असे त्यांनी सांगितले. पर्यावरण संरक्षणासाठी संशोधन, शिक्षण आणि जनजागृती यामध्ये डिजिटल माध्यमांचा योग्य वापर काळाची गरज असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. अध्यक्षीय सामारोपात बोलत असताना प्रा. डॉ. सुनील जाधव म्हणाले कि, डिजिटल ग्रंथालये आणि पर्यावरण संरक्षण यांचा परस्पर संबंध स्पष्ट करत, प्रत्येक विद्यार्थ्याने आणि शिक्षकाने पर्यावरणपूरक जीवनशैली स्वीकारावी, असे आवाहन त्यांनी केले. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये संशोधनवृत्ती व सामाजिक बांधिलकी वाढते, असे त्यांनी नमूद करून आयोजकांचे अभिनंदन केले. या कार्यशाळेच्या प्रमुख पाहुण्यांचा परिचय प्रा. डॉ. अशोक देवगुडे यांनी करून दिला. या कार्यशाळेचे सुत्रसंचलन प्रा. डॉ. बी. बी. लोखंडे यांनी केले तर आभार प्रा. बाळासाहेब जोशी यांनी मानले. या कार्यशाळेला सर्व प्राध्यापक, वृंद शिक्षकेत्तर कर्मचारी व बहुसंख्य विद्यार्थीनी आपला सहभाग नोंदवला.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural ) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# दिपक प्रकाश जाधव यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य आरोग्य शिबिर उत्साहात संपन्न





**रहाटणी । प्रतिनिधी**

सामाजिक बांधिलकी जपत दिपक प्रकाश जाधव यांच्या वाढदिवसानिमित्त रहाटणी येथे आयोजित भव्य आरोग्य शिबिराला नागरिकांचा प्रतिसाद लाभला. दीपक जाधव जनसंपर्क कार्यालय, लिंक रोड येथे हे शिबिर सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत यशस्वीरित्या पार पडले.

या आरोग्य शिबिरामध्ये शालेय विद्यार्थ्यांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली. यामध्ये तब्बल ३३५ विद्यार्थ्यांची तपासणी करण्यात आली. तसेच मोतीबिंदू तपासणी अंतर्गत ४५ नागरिकांची नेत्र तपासणी चष्मा वाटप १०९, ५२ दात्यांनी रक्तदान केले. आरंभ काष्ठ थाळी फुट मसाज अंतर्गत ५८५ नागरिकांनी लाभ घेतला, तर नी- वेदा आयुर्वेदिक क्लिनिक तर्फे फिजिओथेरपी व आयुर्वे दिक उपचार मार्गदर्शनासाठी २१२ रुग्णांची तपासणी करण्यात आली.

याचबरोबर भव्य रक्तदान शिबिराचेही आयोजन करण्यात आले होते. रक्तदान करणाऱ्या प्रत्येक रक्तदात्यास आकर्षक भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले. विशेष बाब म्हणजे, या उपक्रमांतर्गत परिसरातील २०० पात्र नागरिकांना नवीन रेशन कार्ड वाटप करण्यात आले. त्यामुळे अनेक गरजू कुटुंबांना मोठा दिलासा मिळाला. वाढदिवसाचा आनंद सामाजिक उपक्रमातून साजरा करण्याचा संदेश देणारा हा कार्यक्रम नागरिकांकडून विशेष कौतुकाचा विषय ठरला. समाजोपयोगी उपक्रमांतूनच खरा वाढदिवस साजरा होतो, अशी भावना यावेळी उपस्थितांमध्ये दिसूनआली. यावेळी मा. आमदार अश्विनीताई जगताप, विजुशेठ जगताप, मा. विरोधीपक्षनेते नाना काटे, मा.नगरसेवक कैलास थोपटे, मा. नगरसेविका साविताताई खुळे, गोपाळ माळेकर यांच्यासह विविध पदाधीकारी व मित्र परिवार उपस्थित होते.



# स्व.गोपीनाथ मुंडेंचे भाशिप्र सोबत अतुट नाते होते...

## अशक्य गोष्टी शक्य करून दाखवणारा नेता गरिबाचा आधारवडच

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**



स्व.गोपीनाथराव मुंडे यांनी राजकारण करताना समाजातील अठरापगड जातीधर्माच्या कल्याणासाठी चंदनाच्या खोडाप्रमाणे आयुष्य झिजवले. खर्या अर्थाने ते गोरगरिबांना जगण्याचं फार मोठं टॉनिकच होतं. राजकारण करताना त्यांची भुमिका नेहमी सकारात्मक राहिली. विरोधकांचा द्वेष न करता त्यांनाच आपलं करून पुढे जाण्याची जादु त्यांच्याकडे होती. कार्यकर्त्यांच्या जीवाला जीव देणारा नेता त्याहुन अधिक सांगायचं झालं तर त्यांनी दिलेला शब्द राजकारणात पाळला नव्हे तर सत्य करून दाखवला. उपमुख्यमंत्री असताना त्यांच्या पुढाकाराने बीड जिल्ह्यात १०० पेक्षा जास्त साठवण तलाव केले. ज्यातून सिंचन क्षेत्र वाढले.म्हणुनच आज ऊसतोड कामगारांच्या जिल्ह्याची ओळख ऊस पुरवठा करणारा जिल्हा अशक्य गोष्टी शक्य करून दाखवणं हा त्यांचा मुळ स्वभाव असल्याचे त्यांनी सांगितले. येथील खोलेश्वर महाविद्यालयात स्व.गोपीनाथराव मुंडे यांच्या जयंती निमित्ताने आयोजित व्याख्यानात प्रवक्ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.दीपक फुलारी तर व्यासपीठावर उपप्राचार्य डॉ.गौतम गायकवाड, डॉ.बिभीषण फड उपस्थित होते. मुंडे साहेबांच्या प्रतिमेला अभिवादन केल्यानंतर मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक करताना बिभीषण फड यांनी आपल्या आयुष्यात मुंडे साहेबांचे आलेले प्रसंग विशद करून त्यांच्या विचाराने मंत्री पंकजाताई मुंडेंच्या मार्गदर्शनाखाली राजकारणात काम करत असल्याचे सांगितले. यावेळी भारतीय शिक्षण प्रसारक संस्था यांच्यासोबत मुंडे साहेबांचे असलेले अतुट नाते त्यातले काही प्रसंग उपस्थितांना सांगून संस्थेच्या भौतिक प्रगतीत त्यांनी दिलेल्या योगदानाचाही उल्लेख केला. मुंडे साहेब म्हणजे लोकप्रतिनिधी घडवणारा कारखाना असंही म्हटल्या जातं. माझ्यासारख्याला त्यांनी जीवापाड प्रेम करताना हनुमान सेवा करण्याची संधी दिली हेच माझ्या आयुष्यातलं मोठं भाग्य असल्याचे ते म्हणाले. त्यांच्या नेतृत्वामुळे ग्रामीण भागात भाजपाचा विस्तार झाला. अशक्य गोष्टी शक्य करून दाखवणारा नेता असं देखील म्हणता येईल. माणसं जोडणं आणि टिकवून ठेवणं हा त्यांचा मुळ स्वभाव होता.

त्यांच्या आठवणी जाग्या झाल्या तरी आजही पावलोपावली अंगावर शहारे उमटतात या शब्दांत राम कुलकर्णी जयंती निमित्ताने आठवणीला उजाळा दिला. अध्यक्ष पदावरून बोलताना प्राचार्य फुलारींनी नांदेड जिल्ह्यातल्या नायगाव तालुक्यातील मुंडे साहेबांच्या अनेक आठवणी सांगितल्या. असामान्य नेतृत्व पुन्हा होणे नाही या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा.जिजाराम कावळे यांनी केले तर आभार प्रा.श्री अजय डुबे यांनी मानले.

### सुशासन सप्ताह पूर्वतयारी: सेवा पुस्तक अद्यावतीकरण

# सेवा पुस्तक हा कर्मचाऱ्याच्या सेवा काळाचा आरसा: जिल्हाधिकारी दिलीप स्वामी

**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**



अधिकारी असो वा कर्मचारी त्याच्या सेवा कार्यकाळातील सर्व महत्त्वाच्या नोंदी या सेवापुस्तकात ठेवल्या जातात, त्यामुळे अद्यावत राखणे अत्यंत आवश्यक आहे. त्याबद्दल प्रत्येक कर्मचारी अधिकारी यांनी दक्ष असले पाहिजे. सेवा पुस्तक हा कर्मचाऱ्याच्या सेवा काळाचा आरसा असतो,असे प्रतिपादन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज येथे केले.

जिल्ह्यात दि.१९ ते २५ डिसेंबर या कालावधीत सुशासन सप्ताह राबविण्यात येणार आहे. या सप्ताहाच्या पूर्वतयारीचा टप्पा आजपासून सुरु करण्यात आला. त्यात आज सेवापुस्तक नोंदींचे अद्यावतीकरण करण्यात आले. सुशासन सप्ताहात सेवा वितरण सुधारण्यासाठी अर्जांचे निवारण, राज्य पोर्टलवरील सार्वजनिक तक्रारींचे निवारण, सीपी ग्राम्स पोर्टलवरील तक्रारींचे अनावरण, नागरिक सनदचे अद्यावतीकरण, पीजी पोर्टल तक्रारींचे निवारण, सर्वोत्तम प्रशासन पद्धतीचा अवलंब असे विविध टप्पे राबविण्यात येणार आहेत. त्याअंतर्गत आज जिल्ह्यात सेवापुस्तक नोंद अद्यावतीकरण राबविण्यात आले.

जिल्हाधिकारी कार्यालयात नियोजन सभागृहात या उपक्रमाचा प्रारंभ जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करुन करण्यात आला. अपर जिल्हाधिकारी संभाजीराव अडकुणे, निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते, जिल्हा पुरवठा अधिकारी प्रवीण फुलारी तसेच सर्व शाखांचे प्रमुख, आस्थापना विभागाचे कर्मचारी तसेच सर्व संबंधित कर्मचारी उपस्थित होते. प्रत्येक कर्मचाऱ्याला आपले सेवापुस्तक देऊन त्यात तपासावयाच्या नोंदींची सुची देण्यात आली. त्यानुसार अपूर्ण असलेल्या नोंदी तात्काळ संबंधित आस्थापना कारकुनाकडून अद्यावत करुन घेण्यात आल्या.

जिल्हाधिकारी स्वामी म्हणाले की, आपण सेवा करत असतांना दैनंदिन व्यापात आपल्या महत्त्वाचे दस्तऐवज असतांना सेवा पुस्तक याकडेच दुर्लक्ष होण्याची शक्यता असते. मग ज्यावेळी सेवानिवृत्तीची वेळ जवळ येते त्यावेळी सेवा पुस्तकातील त्रुटी पूर्ण करण्यासाठी धावाधाव होते. त्याकरीता आपले आरोग्य आणि सेवा पुस्तक याबाबत नेहमी दक्ष असले पाहिजे.

# संदिपान पांढरखडे यांचे दुःखद निधनं



**ईट। प्रतिनिधी**

ईट येथील संदीपान पांढरखडे यांचे वयाच्या ६५ व्या वर्षी अल्पशाहा आजाराने राहत्या घरी शनिवार दिनांक १३ डिसेंबर रोजी ईट येथे दुःखद निधनं झाले. ते मनमिळाऊ सोभावाचे असल्याने नातेवाईक, मित्र हळ हळ व्यक्त करत आहेत. शनिवारी दुपारी त्यांच्या शेतामध्ये अंत्यविधी करण्यात आला यावेळी डॉक्टर, वकील, पत्रकार गावातील प्रतिष्टीत व्यक्ती उपस्तिथ होते. त्यांच्या पश्चात पत्नी शुभद्राबाई, तीन मुले विनोद, अंगद, नवनाथ सुना नाटवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या दुःखात दैनिक मराठवाडा पत्र परिवार सहभागी आहे. भावपूर्ण श्रद्धांजली.

# केंद्रीय मंत्री गोपीनाथ मुंडे साहेब यांच्या जयंतीनिमित्त जिव्हाळा येथील सर्व अनाथांना केले नवनाथ अण्णा शिरोळे पाटील यांनी अन्नदान

**बीड । प्रतिनिधी**

स्वातंत्र भारत देशाचे माजी केंद्रीय मंत्री स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे साहेब यांच्या जयंतीनिमित्त १२ डिसेंबर रोजी सायंकाळी साडेसातच्या दरम्यान बीड शहरातील नामांकित असलेले भाजी मंडई या ठिकाणी जिव्हाळा बेघर येथे असलेले ३७ वयोवृद्ध माता-पिता यांना स्वर्गीय गोपीनाथ मुंडे साहेबांच्या जयंती निमित्त अन्नदान करून एक आगळी वेगळी जयंती साजरी करून समाजामध्ये एक उत्कृष्ट आदर्श निर्माण करणारे असे भारतीय जनता पार्टीचे नेते तथा भारतीय जनता पार्टीचे बीड जिल्हा उपाध्यक्ष तथा बीड नगर परिषदेचे माजी सभापती तथा महाराष्ट्र राज्य लोकशाही पत्रकार संघाचे मुंबई प्रदेशचे प्रवेश उपाध्यक्ष मा श्री नवनाथ जी अण्णा शिराळे पाटील यांनी हा चांगल्या प्रकारे उपक्रम राबवून सर्व समाजामध्ये एक मुंडे साहेबांनी उत्कृष्ट आदर्श निर्माण केला व जसे संपूर्ण भारत देशामध्ये ज्यांची ओळख आज ही कायम लोकांच्या मनामध्ये आहे व स्वर्गीय मुंडे साहेबांचे नाव आज लोक आधार पूर्वक घेतात असे आमचे आदर्श नेते स्वर्गीय गोपीनाथ मुंडे साहेब यांनी आदर्शदायक काम केले आहे त्यांनी सर्व समाजासाठी समाज हिताचे कार्य करून भारत देशामध्ये एक बीड जिल्ह्याचे नाव स्वर्गीय मुंडे साहेब यांनी लौकिक केले आहे म्हणून त्यांचाच एक आदर्श घेऊन आम्ही पुढे जात आहोत मुंडे साहेबांनी बीडला रेल्वे यावी यासाठी खूप मोलाचे प्रयत्न त्यांनी केले आणि बीडला रेल्वे आणण्यामध्ये खूप मोठा सिंहाचा वाटा स्वर्गीय गोपीनाथ मुंडे साहेबांचा आहे हे देखील बीडच्या सुसंस्कृत नागरिकांमधून वेळोवेळी बोलले जात आहे असे या ठिकाणी आभार व्यक्त करताना मा नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांनी आपल्या उत्कृष्ट विवेक पूर्वक



विचारातून आपले विचार मांडले तसेच या ठिकाणी भारतीय जनता

**जे काही रंजले गांजले त्यासी म्हणे जो आपुले तोचि श्री साधू जाणावा तेथेच श्री देव ओळखावा या श्री संतांच्या वचनाप्रमाणे जिव्हाळा या ठिकाणी ३७ वयोवृद्ध माता-पिता यांना स्वर्गीय गोपीनाथ मुंडे साहेबांच्या जयंतीनिमित्त या अनाथ लोकांना अन्नदान करण्याचे भाग्य मला लाभले हे माझे परम भाग्य समजतो : मा श्री नवनाथ अण्णा शिराळे पाटील ज्येष्ठ नेते भारतीय जनता पार्टी बीड .**

पार्टीचे राज्याचे सरचिटणीस सर्जे राव तात्या तांदळे यांनी देखील मुंडे साहेबांच्या जीवन चरित्रावर प्रकाश टाकत मुंडे साहेबांनी सर्व बहुजन समाजासाठी आपले जीवन व्यतीत केले आहे त्यांनी बीड जिल्ह्यामध्ये रेल्वे यावे दळणवळण चांगल्या प्रकारे चालवे सर्वांच्या हाताला काम मिळावे जेणेकरून बेरोजगारी कमी होऊन रोजगारी वाढेल बीड जिल्हा आर्थिक बाबतीमध्ये विकासित होईल हे स्वप्न पाहिले होते ते स्वप्न त्यांचे आता पूर्ण झाले आहे याचा देखील सर्व बीड करांना सार्थ अभिमान वाटतो की मुंडे साहेबांमुळे आज बीडला रेल्वे आली आहे म्हणून मुंडे साहेबांचे विचार सर्वांनी अकस्मात करावे आणि त्या विचाराने चालावे जेणेकरून कुठेच अडथळा निर्माण होणार नाही असे विचार मुंडे साहेबांचे प्रेरणादायी आहेत असे आपल्या मनोगत पर बोलताना सर्जराव तात्या यांनी थोडक्यात आपले सुसंस्कृत विचार या ठिकाणी व्यक्त केले तसेच या ठिकाणी भारतीय जनता पार्टीच्या नेत्या तथा बीड जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्ष श्रीमती मीराताई गांधले मॅडम यांनी देखील स्वर्गीय गोपीनाथ मुंडे साहेब यांच्या विचारांना चालना देऊन आम्ही पुढे महाराष्ट्र राज्याच्या कॅबिनेट मंत्री श्रीमती पंकजाताई मुंडे यांच्या आदेशाप्रमाणे व त्यांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही सर्वजण बीड जिल्ह्यामध्ये भारतीय जनता पार्टीचे आता काम करत आहोत आणि भारतीय जनता पार्टी हा एक संपूर्ण भारतामध्ये असा पक्ष आहे की तो सर्वांना न्याय देणारा पक्ष आहे मग लाडकी बहीण योजना असो की महिलांसाठी विविध योजना असो या सर्व महिलांचे पदरात कशा पडतील यासाठी सातत्याने प्रयत्न करणारे भारतीय जनता पार्टीचे सर्वच नेते आहेत मग यामध्ये स्वर्गीय गोपीनाथ मुंडे साहेब असो की सध्या महाराष्ट्रामध्ये त्यांच्या पश्चात त्यांच्या एक उत्कृष्ट सुसंस्कृत विचाराने उत्कृष्ट प्रकारे कार्य करणारे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र जी फडणवीस साहेब असोत किंवा महाराष्ट्राच्या कॅबिनेट मंत्री सन्माननीय पंकजाताई मुंडे असोत हे स्वर्गीय गोपीनाथ मुंडे साहेब यांच्या विचाराने चालणारे व्यक्तिमत्व आहेत म्हणून आपण भविष्यात भारतीय जनता पार्टीचे जाळे बीड जिल्ह्यातील प्रत्येक घराघरांमध्ये निर्माण करून एक चांगल्या प्रकारे पक्ष संघटन मजबूत कसे करता येईल याकडे आपण लक्ष देणार असल्याचेही मीराताई गांधले यांनी आपल्या उत्कृष्ट थोडक्यात मांडलेल्या विचारात आपले विचार व्यक्त केले यावेळी येथे उपस्थित असलेले बीड जिल्हा सत्र न्यायालयातील सुप्रसिद्ध संस्कृत लोकांना कायद्याच्या बाबतीत उत्कृष्ट न्याय देवतेकडून न्याय मिळवून देणारे असे एडवोकेट गोविंद जी शिराळे पाटील तसेच भारतीय जनता पार्टी कार्यालय प्रमुख केशव बडे साहेब तसेच बीड शहरातील सर्व प्रतिष्ठित नागरिक तसेच पत्रकार तक्षशिला सोनवणे मॅडम सह पत्रकार संजय देवा कुलकर्णी कुक्कडगावकर यांच्यासह जिव्हाळा केंद्रातील अभिजीत वैद्य साहेब छायाताई सह आदी मान्यवर उपस्थित होते .

दैनिक
# मराठवाडा पत्र
महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर
● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● रविवार, दि. १४ डिसेंबर २०२५ ● पान ४

## अमर रहे..अमर रहे... मुंडे साहेब अमर रहे, लोकनेत्याला अभिवादनासाठी आष्टी तालुक्यात विविध सामाजिक उपक्रम...



### तालुक्यात गावोगावी लोकनेते स्व.गोपीनाथराव मुंडे यांची जयंती जल्लोषात साजरी

**आष्टी । प्रतिनिधी**

राज्याचे माजी उपमुख्यमंत्री, केंद्रीय ग्रामविकास मंत्री ते कणखर विरोधी पक्षनेता अष्टपैलू संपन्न संघर्षशील नेतृत्व लोकनेते स्व.गोपीनाथराव मुंडे यांची शुक्रवार दि. १२ रोजी जयंतीनिमित्त आष्टी तालुक्यात विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. गावोगावी लोकनेते स्व.गोपीनाथराव मुंडे यांची जयंती जल्लोषात साजरी करण्यात आली.मुंडे प्रेमींनी सकाळपासूनच अभिवादन करण्यासाठी गावागावांतील चौकाचौकात जयंती उत्सव स्थळी गर्दी केली होती.तालुक्यामध्ये रक्तदान शिबिरे, आरोग्य तपासणी शिबिरे आणि शैक्षणिक साहित्य वाटप, किर्तन , महाप्रसाद यांसारख्या सामाजिक उपक्रमांद्वारे लोकनेत्याला अभिवादन करण्यात आले, स्थानिक लोकप्रतिनिधीसह हजारो नागरीक सहभागी झाले होते सकाळी लोकनेत्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. गोरगरीब,कष्टकरी, दिनदलित वंचित, ऊसतोड कामगारांचा आवाज म्हणून शेवटच्या श्वासापर्यंत ज्यांनी लढा दिला असे लोकनेते स्व.गोपीनाथ मुंडे यांच्या जयंतीनिमित्त परळीतील गोपीनाथ गडावर, तसेच संपूर्ण राज्यात विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येते. आष्टी तालुक्यात विविध ठिकाणी मुंडे प्रेमींनी मोठी गर्दी केली होती. तालुक्यातील प्रत्येक गावागावात चौकाचौकात शासकीय निमशासकीय कार्यालयामध्ये लोकनेते स्व.गोपीनाथराव मुंडे यांना अभिवादन करुन त्यांच्या ▶▶ उर्वरित पान २ वर

# 31 व्या अखंड नामस्मरण सोहळ्याची भक्तीमय वातावरणात सांगता

## श्री क्षेत्र दत्तमंदिरा पर्यंत ३०० मी. पायऱ्यांचे बांधकाम स्वखर्चातून करण्याचा संकल्प: राजेंद्र मस्के

**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील पाटोदा बे (बेलखंडी) येथील श्री क्षेत्र दत्तमंदिरात ३१व्या अखंड नामस्मरण व गीता पारायण सोहळ्याची सांगता मोठ्या भक्तिभावाने पार पडली. या प्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी भाविकांच्या सोयीसाठी मंदिरापर्यंत ३०० मीटर लोखंडी



ग्रीलसह पायऱ्यांचे बांधकाम स्वखर्चातून करून देण्याचा संकल्प जाहीर केला. श्री दत्तमंदिराचे अध्यात्मिक आणि ऐतिहासिक वैभव असलेले पाटोदा दत्तनगर येतील हे श्री दत्तमंदिर सुमारे दोनशे वर्षांहून अधिक जुने असून महानुभाव पंथाच्या परंपरेचे प्रतीक आहे. उंच टेकडीवरील या मंदिरात जाण्यासाठी वयोवृद्ध व महिला भाविकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. आता पायऱ्यांचे बांधकाम झाल्यानंतर सर्व भक्तांना सुलभपणे देवदर्शन करता येईल, अशी श्रद्धाळूंची अपेक्षा आहे. सोहळ्याचा सांगता समारंभ किर्तन केसरी परमपूज्य श्री पांढरीकर बाबा महानुभाव (खेडी खेडगाव, जळगाव) यांच्या सुश्राव्य कीर्तनाने झाली. त्यांच्या कीर्तनातून ज्ञान, भक्ती आणि वैराग्याचा संदेश सर्वत्र पसरला. या प्रसंगी श्रीधरदादा जामोदेकर संदिपाण बडगे, रविंद्र बडगे, गणेश बडगे, आजीनाथ बडगे, कैलास बडगे, अशोक बडगे, महादेव बडगे, नवनाथ बडगे, यैगेश बडगे, गोविंद बडगे, बाबासाहेब बडगे, कालीदास बनसोडे, चक्रधर बडगे, राजेंद्र वाघमारे, दीगांबर बडगे, निवांत बडगे, हारीदास बडगे, सुनिल लोंढे, समाधान बनसोडे, राहुल बडगे, नानासाहेब बडगे, अवधूत बडगे, बळीराम बडगे, विशाल बडगे यां मान्यवरांसह पंचक्रोशीतील ग्रामस्थ, महिला मंडळी ▶▶ उर्वरित पान २ वर

# तलवाडा पोलीसांनी कुख्यात गोवर्धन सिध्देश्वर येलजाळे ह्यास एमपीडीए अंतर्गत केले स्थानबध्द

## तपेनिमगाव हाद्दीत वाळुच्या ट्रॅक्टरवर तलवाडा पोलीसांची कारवाई

**तलवाडा । प्रतिनिधी**

गंभीर गुन्हयातील कुख्यात आरोपी गोवर्धन सिध्देश्वर येलजाळे रा. रोहीतळ ता. गेवराई जि.बीड हा गावातील नागरीकांना मारहाण करणे, दमदाटी, धमक्या देणे, अवैधरित्या दारुची चोरटी विक्री करणे, महिलांवर अत्याचार करणे, अल्पवयीन मुलींना पळवुन तिच्यावर अत्याचार करणे यासारखे गंभीर स्वरुपाचे गुन्हे वारंवार करीत आहे. त्यामुळे परीसरातील लोकांमध्ये दहशत निर्माण झाले होते. त्यास गुन्हे करण्यापासुन रोखण्यासाठी त्याच्यावर प्रतिबंधात्मक कारवाई सुध्दा करण्यात आली होती. मात्र त्याच्यावर काहीच परीणाम होत नसल्याने सर्वसामान्य जनतेच्या मनात भिती निर्माण झाली होती. गावातील लोकांच्या जिवितास तो बाधा निर्माण करीत होता म्हणुन मा. जिल्हा दंडाधिकारी तथा जिल्हाधिकारी,



बीड यांनी गोवर्धन सिध्देश्वर येलजाळे याचे एमपीडीए कायद्यांतर्गत ▶▶ उर्वरित पान २ वर

### ● तपेनिमगाव हाद्दीत वाळुच्या ट्रॅक्टरवर कारवाई

**दिनांक १२/१२/२०२५ रोजी तपेनीमगाव शिवारातील दत्तबाग येथे एक ट्रॅक्टर वाळूची अवैध रित्या चोरटी वाहतूक करीत असताना मिळून आला एकूण मुद्देमाल ६०५००० रुपये आरोपी परमेश्वर भानुदास शिंदे रा तपेनिमगाव ता गेवराई सदरची कारवाई मा पोलिस अधीक्षक नवनीत कावत, मा अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, मा उपविभागीय पोलीस अधिकारी गेवराई अनिल कटके, पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी तलवाडा मनोज निलंगेकर यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक कैलास अन्नलदास, पो अ विठ्ठल राठोड यांनी केलीआहे.**

# लोकनेते स्व. गोपीनाथरावजी मुंडे साहेबांच्या जयंतीनिमित्त रक्तदान शिबिर संपन्न : गणेश लांडे, जिल्हा सरचिटणीस

**बीड । प्रतिनिधी**

लोकनेते स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या जयंतीनिमित्त भारतीय जनता पार्टीच्या वतीने बीड येथील भाजपा जिल्हा कार्यालयात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या रक्तदान शिबिराचे आयोजन भाजपा जिल्हा सरचिटणीस गणेश लांडे पाटील यांच्या पुढाकारातून करण्यात आले.

या शिबिराचा उद्घाटन सोहळा भाजपा जिल्हाध्यक्ष शंकरजी देशमुख यांच्या हस्ते पार पडला. यावेळी ड. सर्जेराव तात्या तांदळे, भाजपा नेते योगेश भैय्या क्षीरसागर, नवनाथ आण्णा शिराळे, मीराताई गांधले, अशोक लोढा, अजय सवाई, अनिल चांदणे, इर्शाद भाई, सुनीलजी मिसाळ, भाग्यश्री



ढाकणे, आदित्यजी सारडा आदी मान्यवर प्रमुख उपस्थित होते.

या रक्तदान शिबिराच्या माध्यमातून गोरगरीब व गरजू रुग्णांना मोफत रक्तपुरवठा होऊन रक्ताच्या तुटवड्यावर मात करण्यास मदत होत आहे. रक्तदान हे श्रेष्ठ दान असून एका रक्तदात्यामुळे अनेकांचे प्राण वाचू शकतात, असा सामाजिक संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

यावेळी बाबुराव परळकर, ओमप्रकाश गिरी, प्रमोद रामदासी, अमोल वडतीले, राजू शहाणे, संदीप उबाळे, गोविंद शिराळे, महादेव नागरगोजे, कपिल सौदा, कृष्णा तिडके, संभाजी सुर्वे, नरेश पवार, सुरेश पवार, धांडे साहेब, विकास ढोरमारे, राजेश चरखा, अमर सानप, राजू महुवाले, सुशील जाधव, घोडके सर, सलीम अत्तार, केशव बडे यांच्यासह भाजपा पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली.

स्व. गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांनी आपल्या संपूर्ण आयुष्यात सामान्य, शेतकरी, कष्टकरी व वंचित घटकांसाठी अहोरात्र कार्य केले. त्यामुळेच ते ‘लोकनेते’ म्हणून ओळखले जातात. ते आज हयात नसले तरी त्यांच्या कार्याचा ठसा जनतेच्या मनात अढळ आहे. त्यांच्या जयंतीनिमित्त रक्तदान, शालेय साहित्य वाटप, रुग्णांना फळ वाटप, अनाथांना भोजन, दिव्यांगांना सहाय्य साहित्य वाटप असे विविध सामाजिक उपक्रम भारतीय जनता पार्टीच्या माध्यमातून संपूर्ण जिल्ह्यात राबविण्यात येत आहेत.

### चित्रकला स्पर्धेत मुलींनी मिळवले यश

**येळंब (घाट) । प्रतिनिधी**

येथील बळवंतराव कदम माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात दरवर्षी घेण्यात येणाऱ्या नवनीत युवा मास्टर स्ट्रोक ऑल इंडिया ड्रॉईंग स्पर्धेत कु सानिका पायाळ आणि कु जहरीन समीर शेख या विद्यार्थिनींनी घवघवीत यश मिळवले. याबाबत अधिक माहिती अशी की दरवर्षी प्रमाणे याहीवर्षी विद्यालयात नवनीत युवा मास्टर स्ट्रोक ऑल इंडिया ड्रॉईंग स्पर्धा संपन्न झाली. या स्पर्धेत दोन्ही गटात अनेक विद्यार्थी सहभागी झाले. मोठ्या गटातून कु सानिका सुधीर पायाळ तर लहान गटातून कु जहरीन समीर शेख या विद्यार्थिनी स्पर्धेत बाजी मारली. विद्यार्थ्यांना चित्रकला शिक्षक सुरेश सोनटक्के यांनी मार्गदर्शन केले. यशस्वी विद्यार्थिनींचे शाळेत मुख्याध्यापक, सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

# लिंबागणेश गावात बिबट्याचा वावर; ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण

## वनविभागाच्या अधिकाऱ्यांची ग्रामस्थांसोबत बैठक; पिंजरे लावून तातडीने बंदोबस्ताची मागणी



**लिंबागणेश । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील लिंबागणेश गावाच्या पोखरवाडा शिवारात काल रात्री बिबट्याचा वावर आढळून आल्याने शेतकरी व ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. बिबट्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर वनविभागाने तातडीने दखल घेतली आहे. पिंपरनई, पोखरी, बेलगाव, फुकेवाडी ही गावे वनविभागाच्या अधिपत्याखाली येत असून परिसरात घनदाट जंगल असल्यामुळे बिबट्यांचा वावर वाढल्याचे दिसून येत आहे. काही दिवसांपूर्वीच शेतकऱ्यांनी बिबट्या व त्याची पिल्ले परिसरात दिसल्याची माहिती वनविभागाला दिली होती. मात्र, त्यावेळी अधिकृत नोंद नसल्याचे सांगण्यात आले होते.

दि. १२ (शुक्रवार) रोजी रात्री पोखरवाडा शिवारात बिबट्या स्पष्टपणे दिसून आल्याचा व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर आज दि. १३ (शनिवार) रोजी सकाळी वनविभागाचे अधिकारी महेश मते यांनी लिंबागणेश ग्रामपंचायत कार्यालयात ग्रामस्थांशी संवाद साधत मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ▶▶ उर्वरित पान २ वर

### अफवा पसरवू नका ; दक्षता घ्या – आप्पासाहेब रोकडे

**नेकनूर पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक आप्पासाहेब रोकडे यांनी ग्रामस्थांना अफवा पसरवू नये, वनविभागाच्या सूचनांचे काटेकोर पालन करावे व जनजागृतीद्वारे स्वत:चा बचाव करावा, असे आवाहन केले. यावेळी सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक विठ्ठल राठोड, हवालदार गणेश परझने, मन्सूर शेख आदी उपस्थित होते.**

# सरपंच कन्यादान गॅस कनेक्शन वितरण योजना सुरू : ३४ नववधूनां दिले गॅस कनेक्शन

## मिनाक्षीताई पांडुळे यांचा स्तुत्य उपक्रम



**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यातील पिंपरी घूमरी येथील सरपंच दादा पांडूळे यांच्या नावाने सरपंच कन्यादान योजना सुरू करण्यात आली आहे. ही योजना बीड जिल्हा महिला काँग्रेस अध्यक्षा श्रीमती मीनाक्षीताई विनायक पांडूळे पाटील .पिंपरी घूमरी गावातील प्रत्येक मुलीच्या लग्नावेळी गॅस कनेक्शन देण्याची तरतूद करण्यात आली . या गॅस कनेक्शनचा सर्व खर्च मीनाक्षीताई पांडुळे यांच्याद्वारे केला जातो. सरपंच दादा पांडुळे यांनी २०२३ मध्ये सरपंच पदाचा पदभार स्वीकारल्यापासून ते दिनांक १३ डिसेंबर २०२५ पर्यंत गावातील ३४ मुलींच्या लग्नात गॅस कनेक्शन वितरण करण्यात आले आहे. या योजनेला सरपंच कन्यादान गॅस कनेक्शन वितरण योजना असे नाव देण्यात आलेले आहे. सरपंच कन्यादान गॅस कनेक्शन वितरण योजना वितरण तहसीलदार वैशाली पाटील, मा. जि. प. सदस्य उद्धव दरेकर, युवा नेते गणेश (नाना) शिंदे, तसेच सरपंच दादा पांडुळे यांच्या हस्ते वितरण करण्यात आले.

# डिजिटल ग्रंथालय आणि पर्यावरण संरक्षण’ या विषयावर जयभवानी महाविद्यालयात या एक दिवसीय कार्यशाळा संपन्न

**पाटोदा । प्रतिनिधी**

पाटोदा येथील जयभवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे, कला व विज्ञान महाविद्यालय, पाटोदा यांच्या ग्रंथालय विभाग आणि वनस्पतीशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शनिवार,दि. १३ दिसेंबर २०२५ रोजी ‘डिजिटल ग्रंथालय आणि पर्यावरण संरक्षण’ या विषयावरती एक दिवसीय कार्यशाळा महाविद्यालयात संपन्न झाली. याप्रसंगी भारतीय ग्रंथपालनशास्त्राचे जनक पद्मश्री डॉ. एस. आर. रंगनाथन यांना अभिवादन करण्यात आले. ‘डिजिटल ग्रंथालय आणि पर्यावरण संरक्षण’ या एक दिवसीय कार्यशाळेचे उद्घाटन प्राचार्य डॉ. विश्वास कदम, श्री. शिवाजीराव पंडित कला, विज्ञान व वाणिज् महाविद्यालय, शिवाजीनगर गढी यांनी केले. या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सदाशिव सरकटे हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून पर्यावरण शिक्षण व जलसुरक्षा विभाग



शिवाजी महाविद्यालय, परभणी येथील प्रा.डॉ.बापूसाहेब भोसले, हे होते तर व्यासपिठावर अंतर्गत मुल्यमापन हमी कक्षाचे प्रमुख प्रा. विनोद किर्दक तसेच प्रा. डॉ. सुनील जाधव, कनिष्ट विभाग प्रमुख प्रा. सतीश जरांगे यांची उपस्थिती होती. उद्घाटनपर भाषणात बोलताना प्राचार्य डॉ.विश्वास कदम म्हणाले कि, डिजिटल युगात ग्रंथालयांची बदलती भूमिका अधोरेखित करत पर्यावरणपूरक विचारसरणीसाठी डिजिटल ग्रंथालये कशी उपयुक्त ठरतात यावर प्रकाश टाकला. कागदविरहित कार्यपद्धती, ऑनलाइन माहिती साठवण आणि ज्ञानप्रसार यामुळे पर्यावरण संवर्धनास चालना मिळते, असे त्यांनी नमूद केले. या कार्यशाळेचे प्रास्ताविक ग्रंथपाल प्रा. ज्योती रकटे यांनी केले. प्रास्ताविकात कार्यशाळेच्या आयोजनामागील भूमिका स्पष्ट केली. संरक्षणाच्या दृष्टीने डिजिटल ग्रंथालयांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. पेपरलेस ग्रंथालयामुळे पर्यावरण संरक्षणाला मोठी मदत होते. कागदाचा वापर कमी झाल्याने वृक्षतोड थांबवण्यास हातभार लागतो. तसेच माहिती शोधणे, जतन करणे व शेअर करणे अधिक सोपे, वेगवान आणि अचूक होते. संगणक, टॅबलेट, मोबाईल किंवा इंटरनेटच्या साहाय्याने वाचकांना कुठूनही व कधीही माहिती मिळू शकते ▶▶ उर्वरित पान २ वर

# २५ डिसेंबरला जिल्हाधिकारी कार्यालयावर ‘शेतकरी हक्क मोर्चा’

**बीड । प्रतिनिधी**

कापूस आणि सोयाबीन पिके अतिवृष्टी व अवकाळी पावसामुळे मोठ्या प्रमाणात बाधित झाली आहेत. उत्पादन खर्च वाढला. आणि उत्पन्न घटले. अशात बाजारात मात्र भाव कोसळले. त्यामुळे शेतकरी अडचणीत सापडला आहे. शासनाने ठरवलेला हमीभाव जमिनीवरच्या वास्तवाशी जुळत नाही त्यामुळे शेतकरी पुत्रांचा ‘शेतकरी हक्क मोर्चा’ २५ डिसेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकणार असून यासाठी गावपातळीवर बैठका होत आहेत. ‘एक लढा मातीसाठी’ या ब्रीदवाक्याखाली बीड जिल्ह्यातील युवा शेतकरी पुत्रांनी शेतकरी हवक मोर्चा काढण्याचा निर्णय घेतला. जिल्ह्यात विविध ठिकाणी बैठका घेऊन शेतकरी जागृती मोहीम सुरू झाली. २५ डिसेंबर रोजी छत्रपती शिवाजी महाराज चौक, बीड येथून जिल्हाधिकारी कार्यालयापयरत भव्य मोर्चा काढण्यात येणार आहे. शेतात राबणाऱ्या बापाच्या हक्कांसाठी हा लढा असल्याचे शेतकरी पुत्रांनी सांगितले. मोर्चात कापसाला १२ हजार रुपये आणि सोयाबीनला ७ हजार रुपये प्रतिर्िं टल हमीभाव जाहीर करण्याची मागणी होणार आहे.